# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3069/शि.वि./2016
दि. 25/10/2016

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– E– लर्निंग कोर्सेस नोंदणी करण्याबाबत.**

संदर्भ :– 1) अतिरीक्त आयुक्त –1, म.न.पा. यांचे कार्यालयीन पत्र क्र. एच. ओ./1726/एमआयएससी दि.21.10.2016.
2) डि.ओ.15.11.2016 एस.बी.एम दि.14.10.2016

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, केंद्रीय नगर विकास मंत्रालय भारत सरकार व्दारे E– लर्निंग पोर्टल (E-Learning Portal ) सुरू करण्यात आलेले असून या पोर्टलमध्ये सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांकरीता सर्वोत्तम कार्यप्रणालीबाबत ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सदर E-Learning Courses मागील वर्षापासून पोर्टलवर उपलब्ध असून बहुतांश महानगरपालिकेव्दारे या पोर्टलवर नोंदणी करून प्रात्यक्षिक अभ्यासक्रम पूर्ण केलेले आहे. परंतु नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागाव्दारे एकाही शिक्षक/कर्मचाऱ्यांनी नोंदणी केलेली नाही. या पोर्टलवर नोंदणी करणे अतिशय सोपे असून त्याकरीता http://swatcchbharat.cloudapp.net/. या संकेतस्थळावर जावून आपल्या फेसबुक, याहू, जी–मेल काऊंटव्दारे नोंदणी करता येते. या E-Learning Courses क्षमता बांधणी चाचणीचा एक भाग म्हणून स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत समावेश करण्यात आलेला असल्यामुळे त्यावर मार्कींग देण्याचे भारत सरकारव्दारे ठरविण्यात आलेले आहे.

तरी आपल्या शाळेतील सर्व मु.अ./शिक्षक/कर्मचाऱ्यांनी वरील पोर्टलवर नोंदणी करून E-Learning Courses पूर्ण करण्याचे निर्देश मा.अति.आयुक्त–1 यांनी संदर्भिय पत्र क्र.1 अन्वये दिलेले आहे. तरी सर्वांनी नोंदणी करून आवश्यक अभ्यासक्रम पूर्ण करावे व नोंदणी केल्याबाबतचा अहवाल सात दिवसाचे आंत आपले झोनचे शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावा.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

प्रतिलिपी :–

1) मा.अति.आयुक्त–1, म.न.पा.नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
2) मा.उपायुक्त, म.न.पा.नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
3) शाळा निरीक्षक, झोन क्र. 1 ते 10, म.न.पा.नागपूर यांना कार्यवाहीस्तव